**इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना" राबविण्याकरिता सहायक अनुदान देण्याकरिता नवीन लेखाशिर्ष उघडण्यास मंजूरी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक वगृयो-२०२३/प्र. क्र.१०४/योजना-५**
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,मुंबई-४०००३२.
दि.०९ फेब्रुवारी ,२०२४.

**वाचा:** इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन निर्णय क्र. वगृयो-२०२२/प्र.क्र.११/योजना-५, दि.१३.१२.२०२३

**प्रस्तावना -:**

आदिवासी विकास विभागाची स्वयंम योजना व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वाधार योजनेच्या धर्तीवर इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांकरीता निर्वाह भत्याची पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना कार्यान्वित असल्यामुळे सदर योजनेचा लाभ घेत असलेले /घेणारे भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रति जिल्हा ६०० या प्रमाणे एकूण २१,६०० विद्यार्थ्यांकरिता "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना" राबविण्यास संदर्भाधिन दि.१३.१२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजना नवीन असल्याने त्यासाठी नवीन लेखाशिर्ष उघडण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

"ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना" राबविण्याकरिता मागणी क्र.झेडजी-३, प्रधान शीर्ष २२२५ अंतर्गत नवीन उप शीर्ष उघडण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

नवीन लेखाशिर्षाचा तपशील पुढील प्रमाणे आहे:-

| **शिर्षक** | **लेखाशिर्षाचे मराठी नाव** | **लेखाशीर्षाचे इंग्रजी नाव** |
|---|---|---|
| मागणी क्रमांक | झेडजी-३ | ZG-3 |
| मुख्य लेखाशीर्ष | २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण | 2225-Welfare Of Scheduled Castes, Scheduled Tribes, Other Backward Classes and Minorities |
| उप मुख्य लेखाशीर्ष | ०३,मागासवर्गीयांचे कल्याण | 03, Welfare of Backward Classes |
| गौण शीर्ष | २७७, शिक्षण | 277, Education |
| गट शीर्ष | (०२) शिष्यवृत्या विद्यावेतने | (02) Scholarships Stipends |

| | | |
|---|---|---|
| उप गट शीर्ष | (०२) (२६)वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या इमाव, विजाभज (स्वयंम योजनेचा लाभ घेणारे धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून) व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना. | (02) (26) Dnyanjyoti Savitribai Phule Adhar Yojana for Students belonging to OBC, VJNT (Excluding students of Dhangar Community benefiting from Swayam Yojana) and SBC who are deprived of hostel Scheme. |
| अनिवार्य/कार्यक्रम | कार्यक्रम | Scheme |
| तपशीलवार शीर्ष | ३१,सहायक अनुदाने (वेतनेतर) | 31, Grants-in-aid (Non-Salary) |
| संगणक संकेतांक | २२२५ एफ८३५ | 2225F835 |

२. हे आदेश महालेखापाल कार्यालय (लेखा व हकदारी) -१, महाराष्ट्र, मुंबई यांच्याशी विचारविनिमय करुन त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.ख.वि/चा-१/विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग/यूओआर-१६५/२०२३-२४/१०५३, दि.०२.०२.२०२४ तसेच वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र.०१ /अर्थ-५, दि.१६.०१.२०२४ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०२०९१६२१०५९१३४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NARENDRA WAMAN AHER

Digitally signed by NARENDRA WAMAN AHER
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=OTHER BACKWARD AND BAHUJAN WELFARE DEPARTMENT, 2.5.4.20=93ab34830c74c1bdd18aba78607581bb0e2e31858d9e191999dca16966984dbb, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6658A056228A0827243EBC94F7B8895CCED1C1604820C730DA4512E19C8AEF26, cn=NARENDRA WAMAN AHER
Date: 2024.02.09 16:30:07 +05'30'

**( नरेंद्र आहेर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत, माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रषित:-**

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर.
२. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर
३. कार्यासन व्यय-१४/अर्थसंकल्प-५, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. कार्यासन-१४१३, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), इतर मागास बहुजन कल्याण विभाग,मंत्रालय, मुंबई.